# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4Dated27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## National Service Scheme

Dr. Shyam Khandare
Director
Mo. No. - 7020482443

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: www.unigug.org
Email: nssdsw.gug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/NSS/ 333 /2026** **Dt : 18/02/2026**

प्रती,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/रासेयो कार्यक्रम अधिकारी
संलग्नीत यादीतील सर्व महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषयः— दिनांक १९ फेब्रुवारी,२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त गोंडवाना विद्यापीठ, संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालये ''पदयात्रा'' आयोजित करणेबाबत.

संदर्भः— १) सचिव, युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालय (Moyas) भारत सरकार, नवी दिल्ली यांचे D.o No, J,17011/521/2025. My Bharat, दिनांक ०२/०२/२०२६

२) रासेयो —२०२६/प्र.क्र १४/रासेयो कक्ष, दिनांक १६ फेब्रुवारी २०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये सविनय या प्रमाणे आहे कि, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देशभरात श्रध्देने व उत्साहाने साजरी केली जाते या पार्श्वभूमीवर, भारत सरकरच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयामार्फत My Bharat (मेरा युवा भारत) अंतर्गत दिनांक १९ फेब्रवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्यात मेगा पदयात्रा या व्यापक जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उदेश युवकांना छत्रपत्री शिवाजी महाराजांनी दाखविलेल्या शौर्य, सुशासन व राष्ट्रनिर्मितीच्या आदर्शांशी पुन्हा जोडणे हा आहे. ही मेगा पदयात्रा महाराष्ट्रातील सर्व जिल्हांत आयोजित करावयाची असून, मुख्य राज्यस्तरीय कार्यक्रम सातारा येथे आयोजन करण्यात येत आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात साताऱ्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे त्यानुषंगायने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत सरकारच्या युवा व क्रिडा मंत्रालयामार्फत My Bharat (मेरा युवा भारत) सातारा येथे मेगा पदयात्रा (मुख्य राज्यस्तरीय कार्यक्रम) आयोजन करण्यात येत आहे. तसेच त्यानुषांगाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी गोंडवाना विद्यापीठ संलग्नीत सर्व रासेयो महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करुन त्यांचा अहवाल रासेयो विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दिनांक २५/०२/२०२६ पर्यंत सादर करावे.

धन्यवाद!

**डॉ. श्याम खंडारे**
**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.

ई -मेल-nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५

**क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र.१४/रासेयो कक्ष,** **दिनांक:- १६ फेब्रुवारी, २०२६.**

**प्रति,**

**रासेयो संलग्नित कार्यक्रम समन्वयक तथा संचालक (सातारा शहर वगळून),**
**सर्व अकृषि विद्यापीठे/संचालनालये/अभिमत विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.**

**विषय:-** दिनांक १९ फेब्रुवारी, २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्यात **"पदयात्रा"** आयोजित करणेबाबत.

**संदर्भ** :- सचिव, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय(MoYAS), भारत सरकार, नवी दिल्ली यांचे D.O. No. J.17011/521/2025-My Bharat, दिनांक १२/०२/२०२६ रोजीचे अ.शा.पत्र.

उपरोक्त विषयांकित संदर्भाधिन मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १२/०२/२०२६ रोजीच्या अ.शा. पत्राची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

**२.** उपरोक्त अ.शा. पत्राच्या अनुषंगाने येथे नमूद करण्यात येते की, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देशभरात मोठ्या श्रध्देने व उत्साहाने साजरी केली जाते. या पार्श्वभूमीवर, भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयामार्फत MY Bharat (मेरा युवा भारत) अंतर्गत दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्यात **"मेगा पदयात्रा"** या व्यापक युवक जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांना छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखविलेल्या शौर्य, सुशासन व राष्ट्रनिर्मितीच्या आदर्शांशी पुन्हा जोडणे हा आहे. ही मेगा पदयात्रा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत आयोजित करावयाची असून, **मुख्य राज्यस्तरीय कार्यक्रम सातारा** येथे आयोजन करण्यात येत आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात साताऱ्याचे ऐतिहासिक महत्त्व आहे. त्यानुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयामार्फत MY Bharat (मेरा युवा भारत) **सातारा** येथे **मेगा पदयात्रा (मुख्य राज्यस्तरीय कार्यक्रम)** आयोजन करण्यात येत आहे. तसेच राज्यात इतर जिल्ह्यात विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी पदयात्रेचे आयोजन करावे.

**३.** या उपक्रमाचे व्यापक स्वरूप व महत्त्व लक्षात घेता, राज्यातील सर्व विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीदरम्यान खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे:-

- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित व्याख्याने आयोजित करणे.
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित कार्यशाळाचे आयोजन करणे.

- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

४. उपरोक्त संदर्भाधिन अ.शा. पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्रातील विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांनी पदयात्रेचे आयोजन करावे. त्यामध्ये सर्व रासेयो स्वयंसेवकांचा जास्तीत-जास्तं सहभाग नोंदवावा व केलेल्या कार्यवाहीचा सांख्यिकीय अहवाल राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई या कार्यालयास सादर करण्यात यावा.

आपला,

(डॉ.मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना,महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव सादरः-**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. मा.अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय्य सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. उप सचिव (समन्वय /रासेयो कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.